# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

**विषय :-शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष मंजूर प्रवेश क्षमतेच्या ४०% व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी १०% ज्यादा विद्यार्थी मागणी प्रस्तावाबाबत.**

दरवर्षी १२ वी परिक्षेचा निकाल मोठया प्रमाणात लागत असलेमुळे कला, वाणिज्य व विज्ञान (बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षाकरीता तसेच बी.बी.ए./बी.सी.ए अभ्यासक्रमाच्या तृतिय वर्षाकरिता (आवश्यकतेनुसार) उपलब्ध विद्यार्थी संख्या विचारात घेता कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रवेशाबाबत निर्माण झालेली स्थिती विचारात घेवून विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत यासाठी विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम **(विधी, बी.एड. व बीपीएड वगळून)** आणि पारंपारिक अभ्यासक्रमांकरिता (कला, विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा) कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यासाठी विद्यापीठाकडून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

i) संबंधित महाविद्यालयाच्या प्राप्त प्रस्तावानुसार संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरीता सन २०२५-२६ या एकाच वर्षाकरिता महाविद्यालयास शासन मान्य शेवटच्या तुकडीच्या प्रवेश क्षमतेच्या ४०% वाढीव विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता देण्यात येईल.

ii) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ करिता ज्या महाविद्यालयांना पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांसाठी मंजुर शेवटच्या तुकडीच्या ४०% जादा विद्यार्थी किंवा तात्पुरती अतिरिक्त तुकडी मंजुर करण्यात आली आहे अशा महाविद्यालयांना अनुक्रमे द्वितिय व तृतिय वर्षाकरिता तसेच, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रथम वर्षाकरिता शासन मान्य मंजुर शेवटच्या तुकडीच्या ४०% जादा विद्यार्थी प्रवेशित करणेस खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येईल

१. **प्रवेश प्रक्रिया राबवताना शासनाच्या आरक्षण धोरणाचे तंतोतंत पालन करण्यात यावे.**
२. **एकाच शहरात/गावात एकापेक्षा अधिक महाविद्यालये असतील तर नजिकच्या सर्व महाविद्यालयाकडून जादा विद्यार्थी प्रवेश संदर्भात ना-हरकत पत्र सादर करणे आवश्यक आहे.**
३. **संलग्न महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ते शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता वार्षिक संलग्नीकरण शुल्क, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संलग्नीकरणाचा प्रस्ताव सादर केला असल्यास सदर प्रस्तावाचे वाढीव २०%शुल्कासह वार्षिक संलग्नीकरण शुल्क व विद्यापीठाशी संबंधित अन्य सर्वप्रकारचे शुल्क भरल्याच्या पावत्या प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे. जी महाविद्यालये शुल्क भरल्याच्या पावत्या सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांचे कोणतेही प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी.**
४. जी महाविद्यालये पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अतिरिक्त विद्यार्थी संख्या मागणी करणार आहेत अशा महाविद्यालयांना सदर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आवश्यक अर्हताधारक दोन पुर्णवेळ मान्यताप्राप्त शिक्षक उपलब्ध असल्याची कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. तसेच, संलग्नता टी-१ विभागाकडून अधिकृत मान्यता घेण्याची प्रक्रिया पार पाडत असल्याचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.
५. **पदव्युत्तर अभ्यासक्रमाबाबत शिक्षक मान्यतेची माहिती या कार्यालयाचे जा.क्रं.शिवाजी वि/संलग्नता टी-२ / परिपत्रक /११६ दि.२३/०४/२०२५ रोजीच्या परिपत्रकाने नुसार ज्या महाविद्यालयांनी दिली नाही अशा महाविद्यालयांचे प्रस्ताव विचारात घेतले नाहीत.**
६. **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ मधील तदतुदीनुसार या कार्यालयाचे जा.क्रं. १)शिवाजी वि.संलग्नता टी-२ /एजेऑडीट /त्रुटी /०००९ दि.१८/०२/२०२५
२)शिवाजी वि.संलग्नता टी-२ /एजेऑडीट /त्रुटी /००५ दि.११/०३/२०२५ नुसार महाविद्यालय विकास समितीची माहिती सादर करणे आवश्यक आहे.**

..२

७. ज्या महाविद्यालयास ४०% वाढीव विद्यार्थी मान्यता देण्यात येणार आहे, अशा महाविद्यालयांनी त्यासाठी लागणा-या पायाभूत सुविधा, शिक्षक यांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे. ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पुरतीच मर्यादीत राहील आणि या पोटी शासन व विद्यापीठ कोणताही आर्थिक भार उचलणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

टिप :- १) बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. या अभ्यासक्रमाच्या ४०% ज्यादा विद्यार्थी संख्येच्या मान्यतेसाठी रू. ७२०/- व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १०% व व्यावसायिक (बी.बी.ए., बी.सी.एस.(बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स (एंटायर), बी.सी.ए. बी.डेस.) अभ्यासक्रमांच्या ४०% ज्यादा विद्यार्थी संख्येच्या मान्यतेसाठी रु.१२००/- प्रस्ताव शुल्क स्वतंत्रपणे आकारण्यात येईल.

२) ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत शासकीय अनुदान मिळणार नाही, याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

३) वाढीव विद्यार्थी प्रस्ताव सोबतच्या नमुन्यामध्ये विहीत शुल्कासह दि.१५/०७/२०२५ पर्यत विद्यापीठास सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही केली जाणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

४) अपुरे अथवा विलंबाने आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

५) सोबत प्रस्तावाचा नमुना दिलेला आहे. फक्त त्याच नमुन्यामध्येच प्रस्ताव स्वीकारले जातील.

६) ज्या महाविद्यालयांना मागील शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षाकरीता वाढीव विद्यार्थी क्षमता मंजूर केली आहे त्याची प्रत सोबत जोडावी.

७) मागील शैक्षणिक वर्षामध्ये पदव्युत्तर व पदवी करीता वाढीव ~~वाढीव~~ विद्यार्थी क्षमता मंजूर झाली असल्यास त्यावेळी नेमलेल्या शिक्षकांची माहिती सादर करावी.

कळावे.

आदेशान्वये

PSPandav

(डॉ. पी. एस. पांडव)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ No 2 6 3
दि. 21 JUN 2025

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

C:\Users\admin\Desktop\Circular 2025-26 10 & 40 & Fast Trac.docx

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -

प्रति,
मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - प्रथम वर्षाच्या जादा विद्यार्थी मान्यतेबाबत.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांच्या **प्रथम वर्षाकरिता ज्यादा विद्यार्थ्यांची आवश्यकता** आहे.

<table>
<tr><td>१</td><td colspan="9">संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव :-</td></tr>
<tr><td rowspan="5"></td><td rowspan="2">अभ्यासक्रमाचे नाव</td><td rowspan="2">अभ्यासक्रमाचे वर्ष</td><td colspan="2">शासनमान्य मंजूर तुकडी</td><td colspan="2">मंजूर विद्यार्थी संख्या</td><td>प्रस्ताव प्रकार</td><td>भरणा केलेल्या शुल्काचा तपशील (रू.)</td></tr>
<tr><td>अनुदानित</td><td>विनाअनुदानित</td><td>अनुदानित</td><td>विनाअनुदानित</td><td>४०% जादा विद्यार्थी</td><td></td></tr>
<tr><td>बी.ए.</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>बी.कॉम.</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>बी.एस्सी.</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२</td><td colspan="9">सादर केलेली कागदपत्रे -</td></tr>
<tr><td>i)</td><td colspan="9">नजिकच्या सर्व सबंधित महाविद्यालयामधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी असलेल्या मंजूर प्रवेश क्षमतेवर परिणाम होणार नसल्याबाबत महाविद्यालयाचा ना-हरकत दाखला.</td></tr>
<tr><td>ii)</td><td colspan="9">उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी कार्यभारानुसार आवश्यक ते शिक्षक तात्काळ भरण्यात येतील याबाबतचे संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र.<br>गतवर्षी सदर अभ्यासक्रमासाठी जादा विद्यार्थी संख्येसाठी शिक्षक भरलेची माहिती द्यावी.<br>संलग्नता टी-१ विभागाकडे शिक्षक मान्यता प्रक्रिया सुरू असलेली पुरावा कागदपत्रे द्यावीत</td></tr>
<tr><td>iii)</td><td colspan="9">उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध असल्याबाबत संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र.</td></tr>
<tr><td>iv)</td><td colspan="9">ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत भविष्यात शासकीय अनुदान मागणी करण्यात येणार नाही याबाबत रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र.</td></tr>
<tr><td>v)</td><td colspan="9">शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ते शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या कालावधी करिता २०% वार्षिक संलग्नीकरण शुल्क, संलग्नीकरणाचा प्रस्ताव सादर केला असल्याचे सदर प्रस्तावाचे २०% वाढीव शुल्क व विद्यापीठाशी संबंधित अन्य सर्व शुल्क भरल्याचा पावत्या</td></tr>
</table>

उपरोक्त प्रस्तावास विद्यापीठ मान्यता मिळावी ही विनंती.

आपला विश्वासू,

प्राचार्य,
(सही व शिक्का)

टिप - उपरोक्त नमुना फक्त बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. करिताच वापरावयाचा आहे.

F:\23.04.2021\sm\sm\2024-25\Temp Division\Submission1.docx

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -

प्रति,
मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - द्वितीय/तृतीय वर्षाच्या जादा विद्यार्थी मान्यतेबाबत.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आमच्या महाविद्यालयाना खाली नमूद केलेनुसार प्रथम वर्षाच्या मंजूर शेवटच्या तुकडीच्या ४०% विद्यार्थी प्रवेशक्षमता वाढ मान्यता मिळाली होती. यानुसार सदरचे विद्यार्थी उत्तीर्ण झालेने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांच्या **द्वितीय वर्षाकरिता प्रवेशास पात्र झाले आहेत. तसेच सन २०२३-२४ मध्ये द्वितीय वर्षामधील विद्यार्थी उत्तीर्ण होवून तृतीय वर्षाकरीता प्रवेशास पात्र झाले आहेत. सबब, आम्हास ४०% जादा विद्यार्थी मिळणे आवश्यक आहे.**

| १ | **संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव :-** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्सासक्रमाचे वर्ष | शासनमान्य मंजूर तुकडी | | मंजूर विद्यार्थी संख्या | | प्रस्ताव प्रकार | भरणा केलेल्या शुल्काचा तपशील (रू.) |
| | | | अनुदानित | विनाअनुदानित | अनुदानित | विनाअनुदानित | ४०% जादा विद्यार्थी | |
| | **बी.ए.** | | | | | | | |
| | **बी.कॉम.** | | | | | | | |
| | **बी.एस्सी.** | | | | | | | |
| २ | **सादर केलेली कागदपत्रे -** | | | | | | | |
| i) | नजिकच्या सर्व सबंधित महाविद्यालयामधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी असलेल्या मंजूर प्रवेश क्षमतेवर परिणाम होणार नसल्याबाबत महाविद्यालयाचा ना-हरकत दाखला. | | | | | | | |
| ii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी कार्यभारानुसार आवश्यक ते शिक्षक तात्काळ भरण्यात येतील याबाबतचे संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र.<br>गतवर्षी सदर अभ्यासक्रमासाठी जादा विद्यार्थी संख्येसाठी शिक्षक भरलेची माहिती द्यावी.<br>संलग्नता टी-१ विभागाकडे शिक्षक मान्यता प्रक्रिया सुरू असलेली पुरावा कागदपत्रे द्यावीत | | | | | | | |
| iii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध असल्याबाबत संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | | |
| iv) | ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत भविष्यात शासकीय अनुदान मागणी करण्यात येणार नाही याबाबत रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | | |
| v) | मागील शैक्षणिक वर्षात ४०% वाढीव विद्यार्थी मान्यता पत्राची प्रत. | | | | | | | |
| vi) | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता २०% वाढीव शुल्कासह वार्षिक संलग्नीकरण शुल्क, संलग्नीकरणाचा प्रस्ताव सादर केला असल्याचे सदर प्रस्तावाचे २०% वाढीव शुल्क व विद्यापीठाशी संबंधित अन्य सर्व शुल्क भरल्याचा पावत्या** | | | | | | | |

उपरोक्त प्रस्तावास विद्यापीठ मान्यता मिळावी ही विनंती.

आपला विश्वासू,

प्राचार्य,
(सही व शिक्का)

टिप - उपरोक्त नमुना फक्त बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. करिता वापरावयाचा आहे.

F:\23.04.2021\sm\sm\2024-25\Temp Division\Submission1.docx